# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०९.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**नवीन कामठी पोलीसांची कामगीरी :– घरफोडीचा गुन्हा १२ तासाचे आत उघडकीस, संपुर्ण मुद्येमाल हस्तगत, आरोपीस अटक.**

दिनांक ०७.०८.२०२६ चे ११.३० वा. ते २०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, जयभीम चौक, रमेश कबाडीच्या घराजवळ, कामठी येथे राहणारे फिर्यादी सुरेश परमांनद लोणारे वय ५६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कामठी बाजार येथे धान्यविक्रीचे दुकान लावण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख ७५,०००/–रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,६१,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नवीन कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या वर्णनाचे आरोपीबाबत खात्रीशीर माहीती प्राप्त करून, आरोपीस निष्पन्न केले व आरोपी नामे रोहीत नरेश गेडाम वय ४३ वर्षे रा. भिमनगर, जयभीम चौक, कामठी, नागपुर यास ताब्यात घेऊन गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्येमाल व गुन्हयात वापरलेला मोबाईल असा एकुण ४,६९,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री महेश आंधळे, पोउपनि योगेश नालटे, अक्षय झगडे, पोहवा. दीपककुमार चोले, पोअं. नितेश नवघडे, नसीम अंसारी, विलास चिंचुलकर, आकाश टेकाम यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे सिताबर्डी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी राघवेंद्र रवि वय ६७ वर्षे, रा. प्लॉट क्र. २६, बाजीप्रभुनगर, रामनगर, अंबाझरी, नागपूर हे त्यांचे इंस्टीटयुट ऑफ सर्जिकल पॅथालॉजी, पहिला माळा, निती गौरव कॉम्प्लेक्स, रामदासपेठ येथे हजर असतांना, दिनांक ३०.०७.२०२६ चे १४.०० वा. त्यांचे मोबाईलवर देव नावाचे अज्ञात इसमाने फोन करुन, फिर्यादीस ऑनलाइन केवायसीबाबत विचारणा केली. आरोपीने फिर्यादीस त्यांचे व्हॉटस्अप डाऊनलोड करण्यास सांगितले. फिर्यादीने एपीके फाईल डाऊनलोड करुन आरोपीने दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही केली असता, आरोपीने फिर्यादीचे आयसीआयसीआय बॅक खात्यातुन एकूण ७,४९,८५१/— रु. वळते करुन फिर्यादीची ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. यशराज पोमन ९०४९४०९४०२ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१९(२),३१८(४) भा.न्या.सं. सहकलम ६६(क) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** दिनांक ०८.०८.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, प्रज्वल मनोज भोसले वय १९ वर्ष, रा. शिर्डी नगर, प्रभाग क्र. १७, उमरेड रोड, नागपुर हा पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, विहीरगाव ग्रामपंचायत अंतर्गत पोलवर चढून स्ट्रीट लाईट लावण्याचे काम करीत असता, पोलवर ईलेक्ट्रीक करंट लागल्याने पोलवरुन खाली डोक्याचे भारावर पडल्याने गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि. बोरकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. २रे अति. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपूर | २०२९४/ २००१८ | कलम ८२ सीआरपीसी | शोऐब मुश्ताक अहमद रा. घर क्र. ७८४/ए, जेएन रोड, मैमुद्यीन कामठी, वारीसपुरा, नागपूर. | २७.०८.२०२६ |
| २ | मा. दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कामठी | ६५/२०१६ | कलम ८२ सीआरपीसी | आबिद बेग अहमद बेग वय २० वर्ष रा. बकरे का मेला, कामठी, नागपूर | २८.०८.२०२६ |
| **३.** | मा.१५वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०१७९ /२००३ | कलम ४५७,३८७, ५११ भादंवि | राजु उर्फ गोट्या मारोतराव रामटेककर रा. मिनीमाता नगर, शितला माता मंदीरजवळ, कळमणा, नागपूर. | २४.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३११९७५ /२०१२ | कलम २९४, ५०६ भादंवि | मोहसिन शेख शेख बबलु रा. फवारा चौक, निलफरण मस्जिद जवळ, नागपूर | ०२.०९.२०२६ |
| ५. | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०१५७३ /२००९ | कलम ४०६, ३४ भादंवि | १) शेख बब्बु शेख जब्बार वय ४२ वर्ष रा. चितोली झोपडपट्टी, खापरखेडा, नागपूर २) शेख चांद अब्दुल नबी रा. रघुजीनगर पोलीस क्वॉर्टर, सक्करदरा, नागपूर | ०३.०९.२०२६ |
| ६. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०५०१९१ /२००५ | कलम ३८१, ३४ भादंवि | १) कार्तिक नंदु माल वय २२ वर्ष रा. प्लॉट क्र. १०७३, गली क्र. ४, मिनीमाता नगर, उखनकर चे घरी किरायाने, नागपुर २) सुधाकर श्रीराम अजाबळे वय ४० वर्ष रा. रोहना धामणा, ता. हिंगणा जि. नागपूर | ०३.०९.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**